# ।। दादू पंथी को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ दादू पंथी को संवाद लिखंते ।।

।। साखी ।।

अेकण दादु पंथी ।। संता सुखरामजी ने कहयो ।। देवजी पगे लॉगूं ।। अेंट सूं कहयो ।।

तब संत सुखरामजी बोलिया ।।

साखी ।।

चिरंजीव जजमान ठाकूर ।। काहां साँग ओ धाऱ्यो ।।

के सुखराम बरण ने दरसण ।। पेर जनम क्यूँ हाऱ्यो ।।१।।

दादू पंथी साधू सतगुरू सुखरामजी महाराजांशी अकड्न बोलला,देवजी पाया पड्तो,हा दादूपंथी साधू राजपुत होता आणि नवा नवाच साधू बनला होता.हा दादूपंथी साधू, साधू बनायच्या आधी गृहस्थी होता,हा आदि सतगुरू सुखरामजी महाराजांना देवजी पाया पड्तो,असे बोलला होता.साधू झाल्यावर जेंव्हा देवजी पाया पड्तो,असे अकड्न (आखड्न)बोलला,तेंव्हा आदि सतगुरू सुखरामजी महाराज ठाकूरला बोलले,यजमान ठाकूर चिरंजीवी रहा आणि बोलले हे तू काय सोंग धारण केले आहेस?हे तुझे केलेले सोंग चारी वर्णात नाही आहे,तसेच सहा दर्शनांमध्ये ही नाही आहे,असे सोंग करुन,तू मनुष्य जन्म का हारुन गेला आहे. ।।१।।

भला घराँका हातम छोरू ।। काहा करम अे कीया ।।

के सुखराम भँवायां केसा ।। सांग धार क्यूं लीया ।।

तू चांगला,उत्तम म्हणजे राजपुत घराण्याचा म्हणजे कुळवान घराण्याचा पुत्र होता,तू साधुचे सोंग धारण करण्याचे काय कर्म केले.आता तुला भीक मागून खावे लागणार. राजपुतचा हात वरती असतो म्हणजे कोणाला काही देण्याचा असतो,राजपुत आपला हात कोणाच्या समोर पसरवून भीक नाही मागत,तू चांगल्या राजपुत घराण्याचा असून बहूरुपीया सारखे,सोंग धारण करुन भीक मागण्याचे हलके काम का करीत आहेस. ।।२।।

।। इति दादू पंथी को संवाद संपूरण ।।